| |
|---|
| नि.फौ.ख.क्र.२०००/२०२२ |
| सरकार -वि-पवनकुमार |
| निशाणी क्र.१० चा भाग |

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची शपथेवर पुढील सरतपास सरकारी अभियोक्ता व्ही. सी. चावरीया यांचेमार्फत</u>**

८. आता मला दाखविण्यात आलेला जीपी क्र.३१/२०२५ वर दाखल जप्त हत्तीमार चाकू तोच आहे, जो आम्ही जप्त केला होता. त्यावर माझ्या सहीचे व पंचांच्या सहीचे लेबल आहे. त्यावरील मजकूर बरोबर आहे. सदर चाकू **<u>आर्टीकल 'अ'</u>** वर आहे.

**सरतपास पुर्ण**

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ पी.पी. पात्रीकर यांच्याद्वारा</u>**-

९. उपरोक्त नमुद दिवशी गस्तीवर जाण्याकरीता ठाणे दैनंदिनीला नोंद केली होती. त्या नोंदीचा उतारा अभिलेखावर दाखल नाही तसेच आज रोजी देखील मी सोबत आणलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आम्ही गस्तीवर गेलोच नसल्याने त्याबाबतच्या नोंदीचा उतारा अभिलेखावर दाखल नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, चिमनीचौक हा लोकवस्तीचा परिसर आहे. मी सदर परिसरातील लोकांचे जबाब नोंदवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटनाच घडलेली नसल्याने मी घटनास्थळाच्या परिसरातील लोकांचे जबाब नोंदविले नाहीत.

प्रश्न- ज्या गाडीच्या डिक्कीत तुमच्या म्हणण्यानुसार शस्त्र सापडले, त्या गाडी मालकाचे अथवा त्याबाबतच्या कागदपत्रांची चौकशी तुम्ही केली होती काय ?

उत्तर- ती चोरीची गाडी होती व त्याबाबत गुन्हा नोंद क्र.३६२/२०२२ भादंवि कलम ३७९ अंतर्गत लकडगंज पोलीस ठाणे येथे दाखल आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला त्यादिवशी कोणतीही गुप्त बातमी मिळाली नाही, आम्ही घटनास्थळी गेलो नाही, तसेच घटनास्थळी जाउन आरोपीला अटक केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गाडीच्या डिक्कीतुन कोणताही हत्तीमारचाकू जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून कोणत्याही प्रकारचे गाडी किंवा शस्त्र जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्तीपंचनामा पंचासमक्ष तयार केला नाही व तो पोलीस ठाण्यात बसुनच तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी नेहमीच्या लोकांच्या पंच म्हणून सह्या घेतल्या.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मनाई आदेश प्रसारीत केल्याबाबत कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही.हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन जास्त प्रकरणे दाखवण्यासाठी आरोपीविरुध्द खोटे प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, चाकू आर्टीकल अ आम्ही आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले नाही.

<u>उलट तपास पुर्ण</u>

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

JYOTI VILAS PEKHALE

Digitally signed by JYOTI VILAS PEKHALE
Date: 2025.08.07 17:33:22 +0530

**(ज्यो.वि. पेखळे-पुरकर)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ०७.०८.२०२५